Historicity Research Journal
Volume 2 | Issue 6 | Feb 2016
Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

**Research Article**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा समता संघर्ष

**सुनिल रजपूत**
जवाहर महाविद्यालय, अणदूर

**प्रस्तावना :**

भारतीय समाजातील विषमता, दारिद्रय, शोषण आणि अज्ञान हे येथील वर्णव्यवस्था, जातीव्यवस्थेचे अपत्य होय. आणि याच वर्ण व जातीव्यवस्थेने निर्माण केलेल्या गुलामगिरीत दलित, मागासवर्गीय व महिला आपले जीवन जगत होते. अशा परिस्थितीत सुरूवातीच्या काळात महात्मा फुले यांनी दलित, बहुजन समाजात जाणिव जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. तर छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात सामाजिक विषमता दूर सारून समाजातील दुर्बलांना न्याय मिळवून देण्यासाठी विविध कायद्यांची अंमलबजावणी केली. पुढील काळात महात्मा फुले , छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक न्यायाचा वारसा अत्यंत निष्ठेने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चालविला ,यासाठी त्यांनी अनेकदा जनआंदोलनाचा मार्ग देखील स्विकारला.

१३ आक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्हयातील येवले या गावी दलितवर्गीय परिषदेमध्ये डॉ.आंबेडकरांनी घोषणा केली की, "मी अस्पृश्य जातीत जन्माला आलो हा माझा अपराध नाही. परंतू मरताना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही. " या घोषणेप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ आक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे हिंदू धर्माचा त्याग करून बौध्द धर्माचा स्विकार केला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराचा निर्णय हा अचानकपणे घेतलेला निर्णय नाही. हे सर्वप्रथम विचारात घेणे आवश्यक आहे. परंतू असा निर्णय घेण्याच्या अगोदर ज्या घटना घडल्या त्यांचा तपशील आपण समजून घेतला पाहिजे.

बाबासाहेबांनी प्रारंभीच्या काळात अस्पृश्य बांधवांना माणूसकीचे व समानतेचे जे हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे, तो प्रयत्न हिंदू धर्मात व समाजात राहून त्या धर्माचा व समाजाचा एक घटक म्हणून मान्य करूनच त्यांनी प्रारंभीच्या काळात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे.

**समता संघर्षातील काही प्रमुख घटना :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपले उभे आयुष्य दलितांवर होणारे अन्याय दूर करून त्यांना स्वातंत्र्य, समता व बंधूभाव या लोकशाहीच्या उदात्त तत्वानुसार जीवन जगणे शक्य व्हावे यासाठी संघर्ष केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना लोकसभेत आदरांजली वाहताना पंडित नेहरू म्हणाले की, " हिंदू समाजातील छळ करणा-या सर्व प्रवृत्ती विरूद्ध त्यांनी जळजळीतपणे विरोध केला म्हणून लोकांची मने जागृत राहिली होती. जरी ती एक मोठी वादग्रस्त व्यक्ती होती तरी त्यांनी सरकारी कामकाजात मोठे विधायक व महत्वाचे कार्य केले. त्यांनी ज्या विरुद्ध बंड केले त्याविरूद्ध प्रत्येक व्यक्तीने बंड केले पाहिजे "[१]

हिंदू समाजात दिसून येणा-या ज्या छळप्रवृत्ती आहेत अथवा होत्या त्या हिंदू धर्मशास्त्रातून आणि हिंदूंच्या जाती व्यवस्थे संबंधीच्या परंपरागत दृष्टीकोनातून निर्माण झाल्या होत्या. हिंदू समाजातील छळ प्रवृत्तींचे मूळ उगमस्थान मनुस्मृती मध्ये होते. डॉ. आंबेडकरांनी या छळ करणा-या प्रवृत्तींच्या उगमस्थानावर आपले सर्व सामर्थ्य पणास लावून प्रचंड हल्ले केले. मनुस्मृतीसारख्या हिंदू धर्मशास्त्रावर आणि जातीव्यवस्थेवर सातत्याने प्रहार करून त्या छळ प्रवृत्तींचे उच्चाटन करण्याचा बाबासाहेबांनी सातत्याने प्रयत्न केला.

**महाडचे चवदार तळे सत्याग्रह आणि मंदिर प्रवेश सत्याग्रह :-**

२० मार्च १९२७ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चवदार तळ्याच्या पाय-या उतरून खाली गेले ते खाली वाकले आणि त्यांनी तळयातील ओंजळभर पाणी प्राशन केले. आणि त्यांच्या बरोबर असणा-या त्यांच्या शेकडो अनुयायांनी बाबासाहेबांचे अनुकरण करून त्या तळयातील पाणी प्राशन केले. ही घटना भारताच्या इतिहासातील एक अपूर्व अशी घटना होती. कारण या चवदार तळयातील पाणी किडे, मुंग्या इतर जीवजंतू व जनावरे पित असत. ते पाणी पिण्यास अस्पृश्यांना बंदी होती ती उठवून इतर नागरिकांप्रमाणे अस्पृश्यांनाही ते पाणी पिण्याचा हक्क आहे, हे सिध्द करण्यासाठी, बाबासाहेबांनी व त्यांच्या अनुयायांनी हिंदू धर्माच्या व जातीव्यवस्थेच्या निर्बंधाना न जुमानता आपला पाणी पिण्याचा हक्क बजाविला होता.

पण यामुळे सनातनी वृत्तीच्या स्पृश्यांची माथी भडकली. वातावरण तप्त व स्फोटक बनले आणि त्यांनी अस्पृश्यांवर हल्ले केले. तो तलाव शुद्ध करण्यासाठी स्पृश्य हिंदूंनी तळयातून एकशे आठ घागरी पाणी काढले व त्यात पंचगव्य मिळविले. ते पाणी पुन्हा तळयात ओतले. त्यांनतर तळे शुद्ध झाल्याचे जाहीर केले. या घटनांमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मनस्वी वाईट वाटले. म्हणून त्यांनी सत्याग्रह करण्याचे ठरविले. महाडमधील सनातनी स्पृश्य व्यक्तींनी तळे शुद्ध केल्याच्या संदर्भात आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना त्यांनी असे म्हटले की, "अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक नसून तो आमच्या देहावरील कलंक आहे. तो हिंदू धर्मावर कलंक आहे असे जोपर्यंत आम्ही मानीत होतो तोपर्यंत ते काम तुमच्यावर सोपविले होते. आता तो आमच्यावरील कलंक आहे. त्यासाठी तो धुवून काढण्याचे पवित्र कार्य आमचे आम्हीच स्विकारले आहे. त्या कार्याच्या सिध्दीसाठी, आमच्यापैकी काही जणांना आत्मयज्ञ करावा लागला तरी

हरकत नाही. ईश्वरी नियमानेच तसे असेल तर आम्ही स्वत:स भाग्यवान समजतो. तुम्ही तळे शुद्ध करून आमची अपवित्रता सिध्द करण्याचा जो निंदनीय प्रयत्न महाड येथे केला तसा आणखी हवा तर करा. पण आम्ही पवित्र आहोत हे तुमच्या मुखी वदवून घेतल्याखेरीज आमची शांती होणार नाही " [२]

म्हणजे महाडच्या चवदार तळयाच्या सत्याग्रहाचा हेतू समता प्रस्थापित करणे हाच होता. अस्पृश्य अपवित्र नाहीत हे दाखविण्यासाठी सत्याग्रह करून चवदार तळयावरील पाणी पिण्याचा हक्क प्रस्थापित करणे बाबासाहेबांना आवश्यक वाटत होते. इतकेच नाही तर हे कार्य हिंदू समाजाच्या संघटनेच्या दृष्टीने महत्वाचेच आहे. हिंदू समाज एकजीवी व संघटीत होण्यासाठी अस्पृश्यांसह सर्व हिंदूमध्ये समता प्रस्थापित करणे आवश्यक होते. ही समता प्रस्थापीत करण्यासाठीच चवदार तळे अस्पृश्यांना मुक्त करण्याची गरज बाबासाहेबांना वाटत होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रारंभीच्या काळात चवदार तळयाचा सत्याग्रह, राममंदिराचा सत्याग्रह तसेच त्यांच्या अनुयायांनी पुण्याच्या पार्वती मंदिर प्रवेशासाठी केलेला सत्याग्रह आणि अमरावतीच्या अंबादेवी मंदिराच्या प्रवेशासाठी केलेल्या सत्याग्रहाबाबतच्या भूमिकेसंबंधी जेंव्हा आपण विचार करतो, तेंव्हा आपल्या असे लक्षात येते की, बाबासाहेबांनी अस्पृश्यांना मानवी हक्क अर्थात इतर लोकांप्रमाणे समानतेच्या भूमिकेतून समान नागरी हक्क देण्याचा प्रयत्न केला.

**हिंदू मात्राचा जन्मसिध्द हक्कांचा जाहीरनामा : -**

सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी जी सभा आयोजित केली, त्या सभेत जो जाहीरनामा मंजूर करण्यात आला होता . त्या जाहिर नाम्याचे शीर्षक हिंदू मात्राच्या जन्मसिध्द हक्कांचा जाहिरनामा असे होते. हा जाहिरनामा अस्पृश्यांना इतरांबरोबर समानतेचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आला होता असे नाही, तर त्याशिवाय समग्र हिंदू समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक असलेले कोणत्या प्रकारचे हक्क असले पाहिजेत हे -

निदर्शनास आणण्याच्या दृष्टीनेही हा जाहीरनामा महत्वाचा आहे. हिंदू समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपले जन्मसिध्द हक्क कोणते आहेत. हे समजावून सांगण्याचा या जाहीरनाम्याचा उद्देश असल्याचे बाबासाहेबांनी स्पष्ट केले आहे. या जाहीरनाम्यातील काही मद्दे पुढीलप्रमाणे : -

१) सर्व माणसे जन्मत: समान दर्जाची आहेत व ती मरेपर्यंत समान दर्जाचीच राहतील. त्यांचा समान दर्जा तसाच कायम राहील म्हणून राज्यकारभारात आणि सार्वजनिक व्यवहारात समानतेच्या तत्वाला बाधा येईल, अशा कोणत्याही धोरणाला व विचारांना थारा मिळू नये असे या सभेचे मत आहे.

२) वरील जन्मसिध्द मानवी हक्क कायम राहतील हाच राज्यव्यवस्थेचा व समाजव्यवस्थेचा अंमित हेतू असला पाहिजे. याकरिता हिंदू समाजाच्या विषमता मूलक रचनेचा ही सभा तीव्र निषेध करते.

३) कायदा म्हणजे अमुक एका वर्गानेच ठरविलेली बंधने नव्हती.तो कोणत्या प्रकारचा असावा हे ठरविण्याच्या हक्क सर्व जनतेस अगर तिच्या प्रतिनिधीस पाहिजे . हा कायदा संरक्षणात्मक असो वा शासनात्मक असो, तो सर्वांना सारखाच लागू असला पाहिजे. भेदाभेद हा केवळ व्यक्तिच्या गुणभेदामुळे झाला पाहिजे. जन्मामुळे होता कामा नये. याकरिता प्रचलित जातीभेद पध्दतीचा व विषमतेचा ही सभा तीव्र निषेध करते. [३]

**सत्याग्रह करण्याविषयकचा ठराव :-**

दि.२५ व २६ डिसेंबर १९२७ च्या परिषदेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले करण्यासाठी सत्याग्रह करण्याचा ठराव मांडला. हा ठराव मांडताना त्यांनी म्हटले की, "आपल्या स्वत्वासाठी आणि जन्मसिद्ध हक्कांसाठी तुम्ही लढा करण्यास सिध्द आहात हे पाहून मला आनंद होत आहे. या लढयात एकच गोष्ट लक्षात ठेवावयास पाहिजे ती ही की, कोणतेही कायम स्वरूपाचे हित साधून घ्यावयाचे असेल तर त्रास व क्लेश सोसावे लागतात. सुख हे नेहमी दु:खाअंती प्राप्त होत असते. तेंव्हा मनाई हुकुम मोडल्यामुळे तुरूंगात जाण्याचा प्रसंग आला तर तुम्ही डगमगता कामा नये, काठ्या घेऊन सत्याग्रहास जाता येणार नाही. आपला मार्ग न्यायाचा आहे. असे तुम्हास वाटत असल्यास व अनेक हाल अपेष्टा सहन करण्यास तुम्ही तयार असल्यास सत्याग्रहास संमती द्या " [४]

बारा वक्त्यांनी ठरावास पाठिंबा दिला. परिषदेस उपस्थित असलेल्या लोकांनी प्रचंड बहुमतांनी पाहिंबा दिला. परिषदेने हा ठराव मंजूर केल्यांनतर देखील , सत्याग्रह करण्याच्या संदर्भात त्याच सभेत बाबासाहेब म्हणाले की, " मी सांगतो म्हणून तुरूंगात जावून फशी पडणारे लोक मला नकोत. तुरूंगात जाईलच पण माझी अस्पृश्यात मी घालवीन असे म्हणणारी माणसे मला पाहिजेत. अशा त-हेने आत्मयज्ञ करण्यास किती माणसे तयार आहेत, हे ठरविणे प्राप्त आहे. जिल्हाधिका-यांच्या भाषणानंतर तुमचा निर्धार कायम राहिला तर सत्याग्रह करू "[५]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य लोकांमध्ये स्वाभिमान निर्माण करण्याचा, त्यांना आपल्या हक्कासाठी संघर्ष करण्यास कसे तयार करीत होते. हे त्यांच्या वरील विचारावरून स्पष्ट होते. त्यामुळेच बाबासाहेबांनी सत्याग्रह करण्यासंबंधीचा मांडलेला ठराव अत्यंत महत्वाचा मानला जातो.

**अमरावतीचा अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रह :-**

मुंबई इलाक्यात अस्पृश्यांच्या हक्कासाठी विविध मार्गांनी व विविध प्रकारच्या चळवळीच्या माध्यमाद्वारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली प्रयत्न चाललेले असतानाच अमरावतीच्या अंबादेवी मंदिर प्रवेशासंबंधीचा सत्याग्रह विषयक प्रश्न निर्माण झाला. हे मंदिर अस्पृश्य लोकांना खुले करण्यात यावे असा आग्रह कार्यकर्त्यांनी धरला होता. (ऑगस्ट १९२७) त्या मंदिराच्या -

विश्वस्तांना तशी विनंती करण्यात आली होती. त्याबाबतीत शेवटी समेट होऊ शकला नाही. त्यामुळे डॉ. पंजाबराव देशमुख आणि त्या भागातील प्रसिध्द दलित नेते श्री. गवई यांनी मंदिर प्रवेशाचा प्रश्न धसास लावण्याचे ठरविले. त्यासाठी अमरावती येथे एक परिषद घेण्याचे ठरवून त्या परिषदेचे अध्यक्षपद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारावे अशी विनंती करण्यात आली. ही विनंती डॉ. आंबेडकरांनी स्विकारली. या सभेत अध्यक्षपदावरून बोलताना डॉ.आंबेडकर म्हणाले की, "निराकाराचे ध्यान, परमेश्वराचा नामोच्चार हे उपासनेचे विविध मार्ग आहेत. साकाराचे पूजन करावयाचे असल्यास, प्रत्येक हिंदूस मोकळीक असावी. ज्याचा त्याचा देव निराळा स्थापणे हे अयोग्य आहे. देवळे जरी स्पृश्य हिंदूनी बांधली तरी, ती हिंदू धर्माची असून हिंदू धर्माकरीता बांधलेली आहेत.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

हा दावा कोणी एकटयाने केलेला असला तरी, तो सर्व हिंदूंच्या उपयोगाकरिता आहे. हिंदूत्व ही जितकी स्पृश्यांची मालमत्ता आहे, तितकीच अस्पृश्यांचीही आहे. "[६]

अमरावतीच्या अंबाबाई मंदिर प्रवेशाच्या प्रश्नी विचार विनिमय करण्यासाठी जी परिषद बोलावण्यात आली होती, त्यात त्यांनी जे विचार मांडले आहेत, त्यावरून बाबासाहेबांना अस्पृश्यांना मंदिर प्रवेशाचा हक्क का देण्यात आला पाहिजे असे वाटत होते. जर स्पृश्य आणि अस्पृश्य हिंदूच आहेत तर मग या दोघांनाही हिंदूच्या देवळात प्रवेश करण्याचा समान हक्क असला पाहिजे. हिंदूत्व आणि हिंदू संस्कृतीच्या जडणघडणीत स्पृश्य लोकांप्रमाणे अस्पृश्य लोकांचही तितकाच महत्वाचा वाटा आहे. त्यामुळे त्या हिंदू संस्कृतीवर आणि हिंदूत्वावर अस्पृश्यांचाही स्पृश्य लोकांप्रमाणेचे वारसा हक्क आहे. हा वारसा हक्क बजावण्यासाठी मंदिरे, पाणवठे अथवा अन्य सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांसाठी खुली केली पाहिजेत असा जो बाबासाहेब युक्तिवाद करतात तो बिनतोड असल्याचे मान्यच करावे लागेल.

**पुणे येथे पर्वती सत्याग्रह :-**

पुण्याच्या पर्वती मंदिराच्या सत्याग्रहात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्यक्षात जरी भाग घेतलेला नसला तरी तो सत्याग्रह डॉ.आंबेडकरांच्या विचाराच्या प्रेरणेतून आयोजित करण्यात आल्याचे पाहावयास मिळते. पुण्याच्या पेशवेकालीन पर्वती मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यासाठी पुण्यातील समाजसुधारकांनी प्रयत्न केले. त्यामध्ये बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित झालेले श्री. पांडूरंग नथोजी राजभोज, शिवराम जानबा कांबळे , श्री.लांडगे, कदम इ.अस्पृश्य तरूण कार्यकर्ते आघाडीवर होते. त्याचबरोबर स्पृश्य वर्गीय नेते श्री काकासाहेब गाडगीळ, श्री.भुस्कुटे इ. कार्यकर्ते प्रत्यक्षात सामील झाले होते.

श्री सि.बा.लांडगे यांनी पर्वती सत्याग्रहासंबंधी आपली भूमिका " पर्वती सत्याग्रह व सनातनी ऊर्फ सैतानी स्पृश्य " या शीर्षकाची एक छोटी पुस्तिका लिहिली. या छोटेखानी पुस्तिकेमध्ये पर्वती मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करणे आवश्यक का आहे, याबाबतचे विचार व्यक्त केले आहेत. या पुस्तिकेत श्री.सि.बा.लांडगे म्हणतात की, " ज्याला जगात जगावेसे वाटत असेल, त्याने हक्कांसाठी, स्वातंत्र्यासाठी झगडणार नाही, तो परमेश्वराच्या कृपेला पात्र नाही व त्याला परमेश्वर चुकुनही साहाय्य करणार नाही. " [७]

श्री सि.बा.लांडगे यांनी आपल्या हक्कांसाठी व स्वातंत्र्यासाठी अस्पृश्य लोकांनी संघर्ष केलाच पाहिजे असे प्रतिपादन केले आहे. त्यांनी आपल्या पुस्तिकेत बाबासाहेबांचीच हिंदूसमाजांतर्गत सामाजिक समतेची भूमिका विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

पर्वती मंदिराच्या सत्याग्रहास पाठींबा देण्यासाठी मुंबई येथे दामोधर ठाकरसी हॉलमध्ये सभा आयोजित करण्यात आली होती. त्या सभेत पर्वती सत्याग्रहास पाहिंबा देताना डॉ.आंबेडकर म्हणाले की, " देवदर्शनासारख्या साध्या गोष्टीही स्पृश्य बांधवांनी नाकाराव्या यासारखी लाजिरवाणी दुसरी गोष्ट नाही. " [८]

पर्वती मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यास चालविलेल्या सत्याग्रहास बाबासाहेबांचा प्रत्यक्ष कसा पाठिंबा होता हे वर उल्लेख केलेल्या त्यांच्याच दामोधर हॉल मधील भाषणातून स्पष्ट होते.

**नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह : -**

नाशिक मधील काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यासाठी त्या परिसरातील अस्पृश्य मंडळीनी प्रयत्न करण्यास प्रारंभ केला होता. त्यासाठी पांडूरंग राजभोज, सीतामारामपंत शिवतरकर, पतिपावनदास, भाऊराव गायकवाड, द.वि.प्रधान इ.नेते प्रयत्न करीत होते. स्थानिक सत्याग्रह समितीचे अध्यक्ष पतितपावन दास होते. या समितीने विशिष्ट काळात अस्पृश्यांना राम मंदिर खुले केले नाही तर मंदिर प्रवेशासाठी अस्पृश्य लोक सत्याग्रह करतील अशी सुचना दिली होती."

मंदिर प्रवेश सत्याग्रह करण्यासाठी नाशिक येथील काळाराम मंदिराचीच निवड का करण्यात आली असावी याविषयी आपले मत व्यक्त करताना श्री शंकरराव खरात यांनी असे म्हटले आहे की, "मंदिरे म्हणजे हिंदूंचा आत्मा होय. हिंदू ग्रंथात व मंदिरात त्यांचा सगळा जीव असतो. हिंदूंना ग्रंथातून तत्वज्ञान मिळते तर मंदिरात त्यांच्या भावना फुलतात. हिंदूंचे ग्रंथ व मंदिरे ही हिंदूत्वाची जिवंत साक्ष असते. म्हणून अस्पृश्यतेचा प्रश्न सुटण्यासाठी एक पाऊल पुढे पडेल त्याच हेतून डॉ.बाबासाहेबांनी नाशिक येथील काळाराम मंदिरच सत्याग्रहाचे ठिकाण का निवडले याचे कारण "रामचंद्र" हे हिंदूचे पुज्य दैवत आहे. तो जानकीराम म्हणजे हिंदूंचे ह्यदय आहे. प्रत्येक हिंदूंच्या ह्यदयात रामाला स्थान आहे. त्या दृष्टीने रामाच्या मंदिरात प्रवेशासाठी सत्याग्रह सुरू करावा म्हणजे बाकीच्या मंदिराचा प्रश्न सुटेल आणि हिंदूंच्या मनात यथायोग्य बदलही होईल अशी कल्पना होती "[९]

काळाराम मंदिरात अस्पृश्यांनी प्रवेश केल्यामुळे त्यांच्या सर्वच प्रकारच्या समस्या सुटतील असे नाही, याची जाणीव बाबासाहेबांना होती तरी सत्याग्रह करून अस्पृश्यांचा काळाराम मंदिर प्रवेशाचा हक्क मान्य करून घेणे, बाबासाहेबांना आवश्यक वाटत होतें.

**निष्कर्ष -**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महाड येथील चवदार सत्याग्रहामुळे महाराष्ट्रात अस्पृश्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधून घेणा-या विविध प्रकारच्या चळवळीमुळे नव्या युगाचा प्रारंभ झला.

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह, चवदार तळयाचा सत्याग्रह हे दलित बहुजनांच्या सामाजिक गुलामगिरीची बंधने तोडण्यासाठी केलेल्या चळवळी होत्या.

३) भारतातील सामाजिक विषमता हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेतून निर्माण झाली असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ठाम मत होते.

४)डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समता संकल्पनेची सैध्दांतिक मांडणी केली.

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची समतेची संकल्पना अनेकांगी स्वरूपाची होती.

६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर समतेचा अर्थ अधिक व्यापक अर्थाने घेतात.

**थोडक्यात -** महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह, अमरावतीच्या अंबाबाई मंदिर खुले करण्याचा सत्याग्रह, पुण्याच्या पर्वतीचे मंदिर खुले करण्याचा सत्याग्रह, नाशिकच्या काळाराम मंदिराचे दरवाजे खुले करण्याचा सत्याग्रह इ, सत्याग्रहाच्या माध्यमाद्वारे अस्पृश्यांना माणूसकीचे हक्क मिळवून देण्याचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रयत्न केला. त्या त्या सत्याग्रहाच्या प्रसंगी डॉ.आंबेडकरांनी जे विचार व्यक्त केले त्या विचारांच्या माध्यमाद्वारे अस्पृश्यांसह सर्व हिंदूंमध्ये समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला असल्याचे निदर्शनास येते .

**संदर्भसुची**

१) धनंजय कीर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर , पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८१ , तिसरी आवृत्ती , पृ.क्र.५३७-५३८
२) धनंजय कीर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर , पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८१ , तिसरी आवृत्ती , पृ.क्र.९१ ते ९२
३) बहिष्कृत भारत ता.०३/०२/१९२८
४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, संपादन शंकरराव खरात,इंद्रायणी साहित्य, प्रकाशन वर्ष १९८७, पुणे, पृ.क्र.६६
५) कित्ता
६) धनंजय कीर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर , पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८१ , तिसरी आवृत्ती , पृ.क्र.९९-१००
७)श्री.सि.बा.लांडगे लिखित पर्वती सत्याग्रह व सनातनी ऊर्फ सैतानी स्पृश्य या पुस्तिकेवरून
८) भालचंद्र फडके, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, विद्या प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती , पृ.क्र.१०६
९) शंकरराव खरात, अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम , इंद्रायणी प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती , पृ.क्र.२१